## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/१२/२०१६

**१) संगमत करून क्षुल्लक कारणाने शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ०१/१२/२०१६ रोजी ०७.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी छपरीत खाटेवर झोपली असता यातील दोन्ही आरोपीतांनी संगमत करून छपरीत प्रवेश करून वालाचे झाडाचे वेल का कापले या कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीचे घरी तिला ओडतान करून मारपीट केली व भांडण सोडवीण्यास फिर्यादीचा मुलगा शंकर व जावई आकाश हे गेले असता, त्यांना सुध्दा बुक्यानी व काठीने मारपीट केले व शिवीगाळ करून मारण्या पीटण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४४७,३२३,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करून पैशाच्या वादावरून भांडण करून जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ०१/१२/२०१६ रोजी १९.४५ वा. दर. यातील फिर्यादी हि आपल्या घरी हजर असतांना यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे घरी जावुन तुझा पती प्रभुदास पटले पैशाची किस्त का देत नाही या कारणावरून भांडण करून फिर्यादीचे पतीला घरातुन ओडत आणुन मारपीट केली व जिवाने मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५२,३२३,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) खुल्या पोर्च मधुन गॅस सिलेंडरची चोरी :—**

दिनांक २९/११/२०१६ रोजी २२.३० ते ३०/११/२०१६ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. द्वारका सुर्यप्रकाश मेश्राम वय ५२ वर्ष रा. शाहापुर यांचे राहते घरासमोरील खुल्या पोर्च मध्ये ठेवलेले २ गॅस सिलेंडर एचपी. कपंनीची कि. ३,०००/—रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहनगर येथे कलम ३८०भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ०१/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०६, तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व ईतर वाहनांवरती ५९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.